डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र./सीव्हीसी-२०२०-२०२१/९१७/

दि.११.०२.२०२१

## जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी जाहीर आवाहन

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी व निवडणूक, इतर कारणाकरीता अर्ज ऑनलाईन स्वरुपात दि. ०१ ऑगस्ट, २०२० पासून स्विकारण्यात येत असून, अर्ज निहाय सेवा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सोय देखील दि.१२ डिसेंबर,२०२० पासून अर्जदार यांचे सोयीकरिता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन अर्ज प्रक्रीया व ऑनलाईन सेवा शुल्क भरल्यानंतर संबंधीत अर्जदार यांनी सदर अर्जाचे दस्ताऐवजासह समितीस सादर करणे अनिवार्य आहे. अनेक अर्जदार यांनी मुळ दस्ताऐवज व मुळ प्रतिज्ञा पत्रे अद्यापि सादर केलेले नाही तसेच बऱ्याच अर्जदाराने उशिरा सादर केल्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेस विलंब होत आहे. आरक्षित जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणारे/ लाभ घेऊ इच्छिणारे अर्जदार यांनी कृपया अर्जासोबत ऑनलाईन प्रक्रियेवेळी सादर केलेले दस्ताऐवज व मुळ प्रतिज्ञापत्र पत्र (वंशावळ सत्यता प्रमाणपत्र) यासह संबंधीत समिती यांचे समक्ष सादर करावे असे आवाहन श्री. धम्मज्योती गजभिये, महासंचालक, बार्टी तथा मुख्य समन्वयक जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, यांनी केले आहे.

(धम्मज्योती गजभिये) IPoS

महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.
तथा मुख्य समन्वयक